## उप विभागीय अधिकारी कार्यालय, खेड यांजकडून

## अधिसूचना

**भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक कलम १९/एलएक्यु/एसआर-३७/२०२१.— ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या रत्नागिरी जिल्ह्याच्या जिल्हाधिका-याने भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अधिनियम " असा केला आहे.) यांच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, अधिसूचना **महाराष्ट्र शासन राजपत्र** भाग-१, कोकण विभागीय पुरवणी, गुरुवार ते बुधवार, ऑगस्ट १५-२१, २०२४/श्रावण २४-३०, शके १९४६ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनूसुची--दोन मध्ये अधिक तपशिल विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, रत्नागिरीच्या जिल्हाधिका-याने, कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादीत करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्याची खात्री पटली आहे. आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम-१९ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, अनूसुची-तीनमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधीत कुटुंबियाच्या व पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी " पुनर्वसाहत क्षेत्र " म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले जात असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची-चार मध्ये विनिर्दीष्ट केला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये आणि मा. जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचेकडील आदेश क्रमांक/भूसं/समन्वय/कार्या-१/कसचि-१३१८/एसआर, क्र. १२३/२०२१, दिनांक १७ ऑगस्ट २०२१ अन्वये समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी समोचित शासन उप विभागीय अधिकारी खेड, यांना पदनिर्देशित केले आहे ;

प्रस्तुत प्रकरणी नवीन भूसंपादन अधिनियम, २०१३ कलम-११ (१) ची अधिसूचना दिनांक ऑगस्ट १५-२१, २०२४ रोजी महाराष्ट्र **शासन राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात आली व स्थानिक वृत्तपत्रात दिनांक २८ ऑगस्ट २०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. कलम ११ (१) अधिसूचने पासून एक वर्षाच्या आत कलम १९ (१) अधिसूचना प्रसिद्ध होणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने नवीन भूसंपादन अधिनियम, २०१३ कलम १९(१) ची अधिसूचना याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**अनुसूची-एक**

जमिनीचे वर्णन

गाव वावे तर्फे खेड, तालुका खेड, जिल्हा रत्नागिरी

| अ.क्र. (१) | भूमापन किंवा गट क्रमांक (२) | आवश्यक जमिनीचे अंदाजित क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) (३) |
|---|---|---|
| १ | (१८७-जुना गट नंबर) ५३/१ (५३-नवीन गट नंबर) | ०.०९.०० |
| २ | ५३/२ | ०.५५.०० |
| ३ | ५३/३ | ०.४९.३० |
| ४ | ५३/४/१ | ०.०६.०० |
| ५ | ५३/४/२ | ०.४५.५० |
| ६ | ५३/४/३ | ०.२४.१५ |
| ७ | ५३/५ | ०.५६.६५ |
| ८ | (१२३-जुना गट नंबर) ५२/३ (५२-नवीन गट नंबर) | ०.०७.८० |

| अ.क्र.<br>(१) | भूमापन किंवा गट क्रमांक<br>(२) | आवश्यक जमिनीचे अंदाजित क्षेत्र (हे.आर.चौ.मी.)<br>(३) |
|---|---|---|
| ९ | ५२/४ | ०.०१.६० |
| १० | ५२/५ | ०.१०.४० |
| ११ | ५२/६ | ०.०९.०० |
| १२ | ५२/८/१ | ०.१२.७० |
| १३ | ५२/१२+८/२ | ०.२२.३० |
| १४ | (१४७-जुना गट नंबर)<br>११/२१ (२१-नवीन गट नंबर) | ०.०२.०० |
| १५ | ११/४० | ०.०२.५० |
| १६ | ११/४१ | ०.०४.०० |
| १७ | ११/४२ | ०.०३.०० |
| १८ | ११/४३ | ०.०३.०० |
| १९ | ११/४४ | ०.०२.८० |
| २० | ११/४६ | ०.०२.०० |
| २१ | (१३९-जुना गट नंबर)<br>५४/१ (५४-नवीन गट नंबर) | ०.१४.०० |
| २२ | ५४/२ | ०.३८.०० |
| २३ | ५४/३ | ०.३४.४० |
| २४ | (१४०-जुना गट नंबर)<br>५५/७ (५५-नवीन गट नंबर) | ०.००.५० |
| २५ | ५५/१० | ०.२६.५० |
| २६ | ५५/११ | ०.३३.०० |
| २७ | ५५/१२ | ०.८७.१० |
| २८ | (१९२-जुना गट नंबर)<br>५६/१ (५६-नवीन गट नंबर) | ०.०१.१० |
| २९ | (१९१-जूना गट नंबर)<br>५९/१ (५९- नवीन गट नंबर) | ०.०४.३० |
| ३० | (१९०-जूना गट नंबर)<br>१०/२७ (१०-नवीन गट नंबर) | ०.०१.२५ |
| ३१ | १०/२८ | ०.०४.०० |
| ३२ | १०/२९ | ०.००.७० |
| ३३ | १०/३० | ०.००.९० |
| | **एकूण** | **५.७४.४५** |

## अनुसूची-दोन

### सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

**प्रकल्पाचे नाव** : लघुपाटबंधारे योजना वावे तर्फे खेड, तालुका खेड, जिल्हा रत्नागिरी.

**प्रकल्पकार्याचे वर्णन** : लघुपाटबंधारे योजना वावे तर्फे खेड, तालुका खेड, जिल्हा रत्नागिरी वाढीव धरण बैठक, पुच्छ कालवा व पोहोच रस्ता याकरिता भूसंपादन प्रस्ताव.

**समाजाला मिळणारे लाभ** : सदर लघुपाटबंधारे योजना यशस्वी कार्यरत झाल्यानंतर होणा-या पाणी साठयावर परिसरातील गावांचा पिण्याचे पाण्याचा प्रश्न सुटणार आहे. तसेच कालव्याद्वारे पाणी देऊन परिसरातील जमिनी सिंचनाखाली आल्यास उन्हाळी पिके तेथील जनता घेऊ शकणार आहे. एकंदरित सदर धरणातील पाणी साठ्याचा लाभ तेथील जनतेला होऊन शेतजमिनी सुजलाम सुफलाम होणार आहेत.

## अनुसूची-तीन

### पुनर्वसन क्षेत्राचे वर्णन

गावाचे नाव वावे, त. खेड, तालुका खेड, जिल्हा रत्नागिरी

महाराष्ट्र प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन अधिनियम, १९९९ नुसार ज्या पाटबंधारे प्रकल्पाचे क्षेत्र ५० हेक्टरहून अधिक असेल किंवा लाभाधारक परिमंडळ क्षेत्र २०० हेक्टरहून अधिक असेल किंवा गावठाण बाधित होत असेल अशा सर्व पाटबंधारे प्रकल्पांना पुनर्वसन अधिनियम लागू आहे. मात्र मौजे वावे तर्फे खेड, ता. खेड, जि. रत्नागिरी येथील जमीन वाढीव धरण बैठक, पुच्छ कालवा व पोहोच रस्ता याकरिता भूसंपादन प्रस्ताव आहे. सदर प्रकल्पामध्ये घरे/गोठे/इमारती बाधित होत नसून प्रकल्पाचे एकूण ५ हे.७४.४५ आर. क्षेत्र बाधित होत आहे. त्यामूळे सदर ठिकाणी पुनर्वसन करण्याची आवश्यकता नाही.

## अनुसूची-चार

### (पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश)

मात्र मौजे वावे तर्फे खेड, ता. खेड, जि. रत्नागिरी येथील जमीन वाढीव धरण बैठक, पुच्छ कालवा व पोहोच रस्ता याकरिता भूसंपादन प्रस्ताव आहे. सदर प्रकल्पामध्ये घरे/गाठे/इमारती बाधित होत नसून प्रकल्पाचे एकूण ५ हे.७४.४५ आर. क्षेत्र बाधित होत आहे. त्यामुळे सदर ठिकाणी पुनर्वसन करण्याची आवश्यकता नाही.

**टीप**- उक्त जमिनीच्या आराखड्याचे उप विभागीय अधिकारी कार्यालय, खेड कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

खेड,
दिनांक २५ जुलै २०२५.

**वैशाली पाटील,**
उप विभागीय अधिकारी, खेड,
उप विभाग खेड (रत्नागिरी).